**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत करण्यात येणाऱ्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करणेबाबत.**
**श्री इंद्रायणी देवस्थान भोसा (इंद्रायणी माळ), ता. मानवत, जि.परभणी.**

महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः** तीर्थवि-२०२६/ई-१७९१४४८/योजना-११
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक: २१ ऑगस्ट, २०२६**

<u>वाचा</u> :-१) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/योजना-६ दि. १६ नोव्हेंबर, २०१२.
२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीर्थवि-२०२३/प्र.क्र.३६८/योजना-११ दि. २८ डिसेंबर, २०२३.
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दि.०९ जून, २०२५
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचा दि.२५.०५.२०२६ रोजीचा प्रस्ताव.

**प्रस्तावना:-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत "**श्री इंद्रायणी देवस्थान भोसा (इंद्रायणी माळ), ता. मानवत, जि.परभणी**" या "ब" वर्ग ग्रामीण यात्रास्थळाच्या ठिकाणी विविध विकास कामांकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ अन्वये प्राप्त झाला आहे. या प्रस्तावावर मा. सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य निकष समितीच्या दि. १८ जून, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत विचार करण्यात आला. सदर बैठकीत उपरोक्त नमूद यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांची अंदाजपत्रके व इतर कागदपत्रांची तपासणी करुन समितीने विकास कामांकरिता निधीची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) (२५१५ २५६६) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या योजनेंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधीतून "श्री इंद्रायणी देवस्थान भोसा (इंद्रायणी माळ), ता. मानवत, जि.परभणी" या "ब" वर्ग यात्रास्थळाच्या ठिकाणी एकूण **रु.२,३०,००,०००/- (रुपये दोन कोटी तीस लक्ष फक्त)** एवढया रक्कमेच्या खालील विकास कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | यात्रास्थळाचे नाव | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.) | प्रशासकीय मान्यता रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **श्री इंद्रायणी देवस्थान भोसा (इंद्रायणी माळ), ता. मानवत, जि.परभणी.** | १.सभामंडप बांधकाम करणे. | १,००,००,०००/- | १,००,००,०००/- |
| | | २. सुशोभिकरण, पेव्हर ब्लॉक, रिटेनिंग वॉल, ब्रब वॉल करणे. | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| | | ३. सी.सी. रोड करणे. | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |
| | | ४. स्नान कुंड, सुशोभिकरण करणे. | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| | | ५. शौचालय बांधकाम करणे. | १५,००,०००/- | १५,००,०००/- |
| **एकूण** | | | **२,३०,००,०००/-** | **२,३०,००,०००/-** |

२. वरील प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या **१०% इतका निधी म्हणजेच रु. २३.०० लक्ष इतका निधी प्रथम टप्प्यात वितरीत** करण्यात येत आहे. प्रथम टप्प्यात वितरीत निधी खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व कामांची प्रगती शासनास सादर केल्यानंतरच उर्वरित निधी त्या-त्यावेळी उपलब्ध तरतूद व इतर तीर्थक्षेत्रांची निधीची मागणी विचारात घेऊन टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात येईल.

३. सदर कामांच्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मंजूरी (Sanctioned) असल्याची खात्री करावी. तसेच, विकास कामे करावयाची जागा वन विभागाच्या अखत्यारीत नसल्याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी करावी.

४. तसेच, प्रत्येक पायाभूत सुविधेच्या कामास तांत्रिक मान्यता देण्यापूर्वी संदर्भाधिन शासन निर्णय क्र.३ नुसार ऑनलाईन युनिक आयडी क्रमांक घ्यावा व सदर आयडी क्रमांक पोर्टलवर अपलोड करावा. संदर्भाधीन शासन निर्णयानुसार पायाभुत सुविधेबाबत नमूद सर्व बाबींचे तंतोतंत पालन होईल असे पहावे.

५. मंजूर निधीचा योग्यरितीने विनियोग होण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी दक्षता घ्यावी. सदर कामांचा त्यांनी वेळोवेळी आढावा घेऊन कामावर देखरेख ठेवावी व कामांची माहिती उपयोगिता प्रमाणपत्रासह विहित मुदतीत सादर करावी.

६. सदर यात्रास्थळाच्या ठिकाणी करावयाची वरील विकासची कामे इतर कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी खात्री करावी. तसेच, ग्रामविकास विभागाने ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेत या यात्रास्थळाच्या ठिकाणच्या कामांना यापूर्वी प्रशासकीय मान्यता दिली असल्यास ती रक्कम व नवीन प्रशासकीय मान्यता रक्कम मिळून एकूण रु.५.०० कोटीच्या मर्यादेत प्रस्ताव असावा याबाबतची दक्षता प्रकरणपरत्वे संबंधीत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, परभणी यांनी घ्यावी.

७. विकास कामे पूर्ण झाल्यानंतर सदरील कामे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत घेण्यात आल्याचा नामफलक कामाच्या ठिकाणी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा.

८. राज्य शासनामार्फत वेळावेळी प्रस्तुत योजनेविषयी व वित्त विषयक वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश/नियम/शासन निर्णय/वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी करावी. या अटीच्या अधीन सदर प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने, वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.३६५/२०२६/व्यय-१५, दि.०८.०५.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे. तसेच, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रः अर्थसं- २०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि. ०९ एप्रिल, २०२६ मधील अटीची व शर्तीचे पालन करण्यात यावे.

१०. सदर अनुदान मागणी क्र.एल.०३, २५१५ इतर ग्रामीण विकास कार्यक्रम (००) (०८) ग्रामीण भागातील यात्रास्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम (राज्यस्तर) (२५१५ २५६६) योजनांतर्गत ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२१११२१५६७५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2026.08.21 17:56:42 +05'30'

**(प्रशांत पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल, यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
९) विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,

१०) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी,
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी,
१२) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, परभणी,
१३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी,
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी,
१५) अवर सचिव नियोजन विभाग, (का-१४४४) मंत्रालय, मुंबई-३२,
१६) अवर सचिव वित्त विभाग (व्यय १५, अर्थसं १६, अर्थसं १७) मंत्रालय,मुंबई ३२,
१७) कार्यासन क्र. वित्त-१, ग्रामविकास विभाग,
१८) निवड नस्ती (का.यो-११).